SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

Estd : 1962
NAAC `A` Grade
MHRD NIRF-28th Rank

# परिपत्रक

**विषय - सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था व स्वायत्त संस्थेमध्ये शिकविल्या जाणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण असल्याचे प्रमाणपत्राबाबत.**

**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्हयातील संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी पदव्युत्तर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण बाबतची माहिती विद्यापीठाच्या** www.unishivaji.ac.in **या संकेतस्थळावर B.C.U.D.→ Affiliation T-2 'Information/Lists' या लिंकवर उपलब्ध आहे. याबाबत प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाचे अभ्यासक्रम, विषय, प्रवेशक्षमता, तुकडी इ. बाबतची माहिती तपासून त्यामध्ये जर काही दुरुस्ती असल्यास त्याबाबत दि. ०१/०६/२०१८ पूर्वी पुष्ठी करणा-या कागदपत्रासह विद्यापीठ कार्यालयास कळवावे.**

तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शासन मान्यता व विद्यापीठाचे संलग्नीकरण असलेल्या अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरचे प्रमाणपत्र सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था/स्वायत्त संस्था यांनी प्रत्येक वर्षी विद्यापीठाकडून घ्यावयाचे असून सदर प्रमाणपत्रासाठी विद्यापीठाने विहित केलेले खालीलप्रमाणे शुल्क दि. ३० मे, २०१८ पूर्वी विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रमाणपत्राचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **तसेच सदर प्रमाणपत्र सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या प्रवेश माहितीपुस्तिकामध्ये समाविष्ट करणे अनिवार्य असेल याची नोंद घ्यावी.**

पदवी व पदव्युत्तर स्तरावरील संलग्नीकरण मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांचे विषय व पाठयक्रमांच्या प्रमाणपत्राचे शुल्क खालीलप्रमाणे आहे.

१. प्रथम प्रमाणपत्र देतेवेळी रु.५००/- शुल्क आकारण्यात येईल.
२. पुढील वर्षासाठी प्रमाणपत्र देतेवेळी जर संलग्नीकरण मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात बदल असेल तर रुपये २००/- शुल्क आकारण्यात येईल.
३. प्रमाणपत्रात काही बदल नसेल तर रुपये १००/- शुल्क आकारण्यात येईल.
(उपरोक्त शुल्क विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून आकारण्यात आलेले आहे.)

**संलग्नीकरण प्रमाणपत्र मागणी करीताच्या सोबत जोडलेल्या प्रस्तावाच्या नमुना अर्जासोबत खालील बाबींची पुर्तता करावी.**

**टिप :-** **१) मागील वर्षाच्या प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत.**
**२) ज्या अभ्यासक्रमास विद्यापीठाकडून निरंतर संलग्नीकरण मान्यता प्राप्त झाली आहे त्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत.**
**३) नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/शासन मान्य अतिरिक्त तुकडी यांच्या शासन मान्यता व विद्यापीठाचे प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत.**
**४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाने ज्या अभ्यासक्रमांना/पाठयक्रमांना नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास मान्यता दिली आहे त्या पत्राची प्रत.**
**५) सोबत जोडलेल्या अर्जामधील महाविद्यालयास मंजुर प्रवेशक्षमता, प्रवेशित विद्यार्थी व संबंधीत तुकडी/अभ्यासक्रमाच्या शासन मान्यता याबाबतची आधारभूत कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.**

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

**संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/** 67
**दि.** 23 MAY 2018
**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था व स्वायत्त संस्था.**

D:\Mangutkar\2016-17\Submission.Docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या पाठ्यक्रमांचे संलगनीकरण प्रमाणपत्र मिळण्याबाबत
संदर्भ - शिवाजी विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांना विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त आहे.

<table>
<tr><td>१</td><td colspan="8">संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव व पत्ता :-</td><td colspan="3">ता.</td><td colspan="2">जि.</td></tr>
<tr><td rowspan="2"></td><td rowspan="2">अ. क्र.</td><td rowspan="2">अभ्यासक्रमाचे नाव</td><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">भाग</td><td colspan="2">शासनमान्य मंजूर तुकडी</td><td colspan="2">मंजूर विद्यार्थी संख्या</td><td colspan="2">प्रवेशित विद्यार्थी (शैक्षणिक वर्ष २०१७-१८)</td><td rowspan="2">शासन मान्यता संदर्भ क्र.</td><td rowspan="2">विद्यापीठ मान्यता संदर्भ क्र.</td></tr>
<tr><td>अनुदानित</td><td>विनाअनुदानित</td><td>अनुदानित</td><td>विनाअनुदानित</td><td>अनुदानित</td><td>विनाअनुदानित</td></tr>
<tr><td></td><td>१</td><td>बी.ए.</td><td>३ वर्ष</td><td>१/२/३</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>२</td><td>बी.कॉम.</td><td>३ वर्ष</td><td>१/२/३</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>३</td><td>बी.एस्सी.</td><td>३ वर्ष</td><td>१/२/३</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>४</td><td>इतर अभ्यासक्रम (M.A., M.Com, M.Sc. CoC, PG Diploma, etc)</td><td>----</td><td>----</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="12">अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सांकेतांक-</td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="12">महाविद्यालय शहरी/ग्रामीण- आहे.</td></tr>
<tr><td>४.</td><td colspan="12">महिला महाविद्यालय असल्यास - होय/ नाही</td></tr>
<tr><td>५.</td><td colspan="12">स्वायत्त(Autonomous) संस्था/महाविद्यालय आहे/नाही</td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="12">महाविद्यालय शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित</td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="12">अनुदानित असल्यास महाविद्यालयास अनुदान देणारा शासन विभाग-</td></tr>
<tr><td>८</td><td colspan="12">प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे -</td></tr>
<tr><td>i)</td><td colspan="12">मागील वर्षाच्या प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत</td></tr>
<tr><td>ii)</td><td colspan="12">ज्या अभ्यासक्रमास विद्यापीठाकडून निरंतर संलग्नीकरण मान्यता प्राप्त झाली आहे त्या पत्राची साक्षाकित प्रत</td></tr>
<tr><td>iii)</td><td colspan="12">नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/शासन मान्य अतिरिक्त तुकडी यांच्या शासन मान्यता व विद्यापीठाचे प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत.</td></tr>
<tr><td>iv)</td><td colspan="12">महाविद्यालयास निरंतर संलग्नीकरण असल्यास त्याबाबतचे विद्यापीठाचे पत्र</td></tr>
<tr><td>v)</td><td colspan="12">शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाने ज्या अभ्यासक्रमांना/पाठ्यक्रमांना नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास मान्यता दिली आहे त्या पत्राची प्रत.</td></tr>
</table>

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र मिळावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
(सही व शिक्का)

D:\Mangutkar\2016-17\Submission.Docx